

सस्नेह निमंत्रण

प्रति,
श्री. .....

दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ, बाभळगाव द्वारा संचलित

कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय

बाभळगाव ता. जि. लातूर

स्वामी दयानंद सरस्वती व्याख्यानमाला (पुष्प २३ वे)
लोकनेते विलासरावजी देशमुख स्मृतिदिन विशेष

गुरुवार दिनांक १३.०८.२०२६ रोजी सकाळी १०:३० वा

विषय : लोकनेते विलासराव देशमुख: नेतृत्व, विकासदृष्टी आणि वर्तमानकालीन संदर्भ

: अध्यक्ष :

डॉ. दुष्यंत कटारे

(प्राचार्य, कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगाव)

: व्याख्याते :

मा. प्रा.डॉ. प्रल्हाद लुलेकर

(प्रसिद्ध लेखक, विचारवंत, छत्रपती संभाजीनगर)

: प्रमुख उपस्थिती :

मा. श्री. शामराव देशमुख

(सचिव - दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ, बाभळगाव)

-: विनीत :-

: व्याख्यानमाला समिती :

डॉ. रणजित जाधव डॉ. माधव गायकवाड

: स्थळ :

स्व. दगडोजीराव (दादा) देशमुख सभागृह

देशोन्नती

कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालयात व्याख्यान

देशोन्नती वृत्तसंकलन

लातूर : महाराष्ट्राच्या राजकीय आणि सामाजिक जीवनावर आपल्या नेतृत्वाची स्वतंत्र छाप उमटविणारे लोकनेते, माजी मुख्यमंत्री तथा केंद्रीय मंत्री विलासराव देशमुख यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या नेतृत्वाचा, विकासदृष्टीचा आणि आजच्या बदलत्या महाराष्ट्राच्या संदर्भातील प्रासंगिकतेचा वेध घेणाऱ्या विशेष व्याख्यानाचे आयोजन कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगाव येथे करण्यात आले आहे.

दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ, बाभळगाव संचलित कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालयाच्या स्वामी दयानंद सरस्वती व्याख्यानमालेअंतर्गत (पुष्प २३ वे) गुरुवार, दि. १३ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता हा विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. 'लोकनेते विलासराव देशमुख : नेतृत्व, विकासदृष्टी आणि वर्तमानकालीन संदर्भ' हा या विशेष व्याख्यानाचा विषय आहे. प्रसिद्ध लेखक, विचारवंत तथा छत्रपती संभाजीनगर येथील डॉ. प्रल्हाद लुलेकर हे प्रमुख व्याख्याते म्हणून मार्गदर्शन करणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे डॉ. दुष्यंत काटरे राहणार असून प्रमुख उपस्थिती म्हणून दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ, शामराव देशमुख, बाळासाहेब देशमुख उपस्थित राहणार आहेत.



स्वामी दयानंद सरस्वती व्याख्यानमाला (पुष्प 23 वे) उद्घाटन प्रसंगी प्रमुख व्याख्याते प्रा.डॉ.प्रल्हाद लुलेकर संस्था सचिव मा.श्री शामराव देशमुख प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे, व्याख्यानमाला समिती प्रमुख प्रा.डॉ.रणजित जाधव, श्री. कैलासराव देशमुख



प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून देताना प्रा.डॉ. जयदेवी पवार



प्रमुख व्याख्याते प्रा. डॉ. प्रल्हाद लुलेकर, छत्रपती संभाजीनगर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना.





प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे अध्यक्षीय समारोप करताना



आभार व्यक्त करताना प्रा.डॉ. नरेंद्र देशमुख



कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना प्रा.डॉ. रणजित जाधव

बाभळगाव येथे व्याख्यानमाला...



बाभळगाव येथील कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालयात आयोजित व्याख्यानात बोलताना ज्येष्ठ विचारवंत डॉ. प्रल्हाद लुलेकर. मंचावर संस्थेचे सचिव शाम देशमुख, महाविद्यालयाचे अधीक्षक बाळासाहेब देशमुख, प्रा.डॉ. रणजीत जाधव.

विलासरावांच्या नेतृत्वाची दृष्टी आजही प्रेरणा देणारी

लोकमत न्यूज नेटवर्क

लातूर : सत्तेच्या विविध शिखरांवर पोहोचल्यानंतरही मातीशी आणि माणसांशी असलेले नाते कायम जपणारे नेतृत्व म्हणून विलासराव देशमुख यांची ओळख होती. केवळ पद आणि सत्ता नव्हे, तर संवाद, समन्वय आणि सर्वसमावेशक विकासाची दृष्टी त्यांच्या नेतृत्वात होती. त्यामुळे विलासराव देशमुख यांचे नेतृत्व पदापेक्षा विचारांनी मोठे होते, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. प्रल्हाद लुलेकर यांनी केले.

ज्येष्ठ विचारवंत डॉ. प्रल्हाद लुलेकर; बाभळगाव येथे व्याख्यानमालेचे विशेष पुष्प

कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगाव येथे लोकनेते विलासराव देशमुख यांच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित स्वामी दयानंद सरस्वती व्याख्यानमालेच्या २३व्या विशेष पुष्पात डॉ. लुलेकर बोलत होते. यावेळी दयानंद शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव शाम देशमुख, महाविद्यालयाचे अधीक्षक बाळासाहेब देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती. बाभळगावचे सरपंच ते केंद्रीय मंत्रिमंडळ असा विलासराव देशमुख यांचा प्रवास संघर्षमय होता. त्यांच्या राजकीय प्रवासाकडे केवळ पदांची चढती कमान म्हणून पाहणे त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर अन्याय करणारे ठरेल. सत्तेच्या शिखरावर पोहोचल्यानंतरही त्यांनी आपल्या मातीशी आणि माणसांशी असलेले नाते जपले. त्यांची विकासाची दृष्टी माणूसकेंद्री होती, असे डॉ. लुलेकर यांनी सांगितले. समन्वय, संवाद आणि सर्वसमावेशक विकासाच्या त्रिसूत्रीतून महाराष्ट्राला पुढे नेण्याची त्यांची नेतृत्वदृष्टी आजही प्रेरणादायी आहे. राजकारण मोठे होते ते पदामुळे नव्हे, तर त्यामागील दृष्टी, संवादाची क्षमता आणि माणसांना सोबत घेऊन जाण्याच्या वृत्तीमुळे, असेही त्यांनी नमूद केले.

वैचारिक प्रबोधनाची महाविद्यालयाची परंपरा...

अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे यांनी विलासराव देशमुख यांच्या विचारांचा आणि कार्याचा गौरव केला. महाविद्यालयाने वैचारिक प्रबोधनाची परंपरा सातत्याने पुढे नेली असून, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबविले जात असल्याचे त्यांनी सांगितले. प्रस्तावना डॉ. रणजीत जाधव यांनी केली.

पाहुण्यांचा परिचय डॉ. जयदेवी पवार यांनी करून दिला. सूत्रसंचालन डॉ. माधव गायकवाड यांनी केले, तर आभार डॉ. नरेंद्र देशमुख यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्रा. चंद्रकांत मोरे, प्रा. सोपान डोपे, वसंत मस्के, दत्ता फुलगामे, बालाजी देशमुख आणि नितीन पाटील यांनी परिश्रम घेतले. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

Hello Latur
Page No. 2 Aug 19, 2026
Powered by: erelego.com

पुरोगामी विचाराचे
एकमत

विलासराव देशमुख यांची विकासदृष्टी प्रेरणादायी

ज्येष्ठ विचारवंत डॉ. लुलेकर यांचे प्रतिपादन ■ दयानंद सरस्वती व्याख्यानमालेचे २३ वे पुष्प

बाभळगाव : वार्ताहर



केवळ आकडेवारीची नव्हे, तर माणसांच्या जीवनात परिवर्तन घडविण्याची दृष्टी देणारे विलासरावांचे नेतृत्व होते. समन्वय, संवाद आणि सर्वसमावेशक विकासाच्या त्रिसूत्रीतून महाराष्ट्राला पुढे नेण्याची त्यांची नेतृत्वदृष्टी आजही तितकीच प्रेरणादायी आणि प्रासंगिक आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्रातील ज्येष्ठ विचारवंत डॉ. प्रल्हाद लुलेकर यांनी केले.

कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगावचे येथे आयोजित लोकनेते विलासराव देशमुख यांच्या स्मृतिदिनी स्वामी दयानंद सरस्वती व्याख्यानमालेचे २३ वे विशेष पुष्प गुंफताना ते बोलत होते.

यावेळी त्यांनी लोकनेते विलासराव देशमुख यांच्या कार्याचा व्यापक परिघ अधोरेखित केला. 'बाभळगावचे सरपंच ते केंद्रीय मंत्रिमंडळ असा त्यांचा प्रवास संघर्षमय होता. विलासराव देशमुख यांच्या राजकीय प्रवासाकडे केवळ पदांची चढती कमान म्हणून पाहणे त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर अन्याय करणारे ठरेल मात्र, सत्तेच्या विविध शिखरांवर पोहोचल्यानंतरही त्यांनी आपल्या मातीशी आणि माणसांशी असलेले नाते कायम जपले. आज सत्तेच्या शिखरावर पोहोचलेले अनेक नेते मागे वळून पाहत नाहीत मात्र विलासरावजी याला अपवाद होते. त्यांची विकासाची दृष्टी ही माणूसकेंद्री होती, असेही डॉ. लुलेकर यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे यांनी विलासराव देशमुख यांच्या विचारांचा आणि कार्याचा गौरव केला. आदरणीय दगडूजीराव देशमुख यांच्या संकल्पनेतून सुरू झालेली ही व्याख्यानमाला आज अखंडितपणे सुरू आहे. याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. यावेळी दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ, बाभळगावचे सचिव शाम देशमुख तसेच महाविद्यालयाचे अधीक्षक बाळासाहेब देशमुख यांची मंचावर उपस्थिती होती. प्रस्तावना व्याख्यानमाला समिती प्रमुख डॉ. रणजीत जाधव यांनी केली. पाहुण्यांचा परिचय मराठी विभाग प्रमुख डॉ. जयदेवी पवार यांनी करून दिला. सूत्रसंचालन डॉ. माधव गायकवाड यांनी तर आभार डॉ. नरेंद्र देशमुख यांनी मानले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. चंद्रकांत मोरे, प्रा. सोपान डोपे , वसंत मस्के, दत्ता फुलगामे, बालाजी देशमुख, नितीन पाटील यांनी परिश्रम घेतले.